Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259

| Vol - V | Issue-IV | APRIL | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574 |
|---|---|---|---|---|---|

# नागपूर व अमरावती जिल्ह्यातील व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंच्या समायोजन योग्यतेचा अभ्यास

**शालिक सवाईराम राठोड**
प्रगती महिला कला महाविद्यालय, भंडारा

**डॉ. राजु महादेव राऊत**
ज्योतिबा कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, नागपूर

**प्रस्तावना**

आजच्या धकाधकीच्या काळात मानवी जीवनात खेळाला फार महत्त्व आलेले आहे. खेळांमुळे सांघिक कार्याचा अनुभव, संघाबद्दल किंवा आपल्या समुहाबद्दल अभिमान, खिलाडूवृत्ती आणि नेतृत्त्व गुणविकास यांना वाव मिळतो आहे. तसेच जागरुकता, चापल्य, श्रेष्ठत्व, विरवृत्ती, हिम्मत इत्यादी वैयक्तिक गुणांचा विकास याच खेळाच्या माध्यमातून अगदी सहजपणे होण्यास मदत होते आहे. खेळामुळे स्नायुसंवर्धन सुयोग्य हालचालीतील समन्वयाबरोबर शारीरिक सुदृढतेची वाढ होते (आलेगांवकर, १९८९). पूर्वी खेळाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितल्या जात नव्हते, परंतु आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक घटकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो व खेळाचे क्षेत्र वेगळे राहिले नाही. खेळात किंवा खेळाच्या स्पर्धेत वैज्ञानिक घटकांच्या प्रयोगामुळे खेळाडू आपल्या क्षमतेला उंच शिखरावर पोहोचविते आहे, याचे कारण म्हणजे खेळात वैज्ञानिक घटकांचा प्रयोग.

क्रीडामानसशास्त्र अध्ययनामुळे आज खेळाच्या क्षेत्रात वैज्ञानिक अध्ययन संभव झाले आहे. समाजात आज खेळाला किंवा क्रीडा प्रकाराला जे स्थान प्राप्त झाले आहे; त्यामुळे खेळाच्या कौशल्याचा वैज्ञानिक अभ्यास होत आहे. क्रीडामानसशास्त्र खेळाडूंच्या क्षमता कोणत्या आहेत, त्यांच्या मनाची ठेवण व त्यानुसार होणारे वर्तन इत्यादीचा मानसशास्त्र अभ्यास करते (आलेगांवकर, १९९४). क्रीडाशास्त्रात विविध क्रीडाकौशल्याच्या प्रदर्शनाच्या वेळी होणाऱ्या वर्तनांचा खेळाडूंच्या आंतरिक–प्रेरणांचा, व्यक्तिमत्त्वाचा, वैयक्तिक व सांघिक दृष्ट्या क्रीडामानसशास्त्र अभ्यास करते.

व्यक्ती आपल्या विकासासाठी तसेच कौटुंबिक हित व सामाजिक स्वास्थ्यासाठी निरनिराळ्या सद्भावनांचा विकास करत असते. मात्र हा विकास होत असता सभोवतीचा परिसर, व्यक्तीचे आपले स्वत:चे जीवनविषयक विचार आडाखे, संकल्पना, अपेक्षा यांचा परस्पर संघर्ष होत असतो. त्या संघर्षामधून सुटण्यासाठी व अधिक योग्य मार्ग काढण्यासाठी व्यक्ती आपल्या परीने वर्तन करत असते आणि आपले जीवन घडवीत असते. असे करतांना व्यक्तीला जे काही आपले विचार, भावना मूल्ये यांची तडजोड करावी लागते ती म्हणजे व्यक्तीने केलेले समायोजन असते. या अनुशंगाने व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करण्यात आला.

**परिसीमा–**

१. प्रस्तुत अध्ययन विदर्भातील नागपूर व अमरावती जिल्ह्यांपर्यंत मर्यादित होते.
२. प्रस्तुत अध्ययन आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंपर्यंत मर्यादित होते.
३. प्रस्तुत अध्ययनात १८ ते २५ वर्ष वयोगटातील खेळाडूंचा समोवश करण्यात आला.

**सीमा–**

१. तथ्य संकलीत करतांना उत्तरदात्यांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर नियंत्रण नव्हते.
२. पर्यावरणीय स्थितीवर नियंत्रण राहणार नव्हते.

**संशोधनाचा उद्देश–**

– नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन क्षमतेचे तुलनात्मक अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहितक**

१. नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन स्तरां दरम्यान सार्थक अंतर आहे

**संशोधन पद्धती**

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपूर्ती होण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

**खेळाडूंची निवड**

नागपूर व अमरावती जिल्ह्यातील महाविद्यालयांमधून आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल या खेळांमध्ये भाग घेणाऱ्या १८ ते २५ वर्षे वयोगटातील खेळाडूंची यदृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली. व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल या खेळातील प्रत्येकी ७५ पुरूष खेळाडूची याप्रमाणे ४५० खेळाडूंची निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनात “प्रमाणित परिक्षण चाचणी अनुसूची” तंत्राचा वापर करण्यात आला. प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलनाच्या पद्धतींचा उपयोग करण्यात आला. संशोधनाकरिता आवश्यक असलेली माहिती संकलित करण्याकरिता प्रश्नावली या साधनांचा उपयोग करण्यात आला. समायोजन स्तराची माहिती प्रमाणित चाचणीच्या आधारे संकलित करण्यात आली. समायोजन स्तर जाणुन घेण्याकरिता ए.के.पी. सिन्हा आणि आर. पी. सिंग यांनी तयार केलेली Adjustment Inventory for college students (AICS) या चाचणीचा वापर करण्यात आला.

**सांख्यिकीय विश्लेषण आणि अर्थविवेचन**

**कौटुंबिक समायोजन स्तर**

**सारणी क्र.१: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणाऱ्या खेळाडूंचे कौटूंबिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | | नागपूर जिल्हा | | अमरावती जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | प्रतिशत | वारंवारीता | प्रतिशत |
| व्हॉलीबॉल | अत्याधिक | २३ | ३०.७ | ९.० | १२.० |
| | साधारण | ४२.० | ५६.० | ३४.० | ४५.३ |
| | कमी | १०.० | १३.३ | ८.० | १०.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **५१.०** | **६८.०** |
| हॅन्डबॉल | अत्याधिक | ४० | ५३.३ | २८.० | ३७.३ |
| | साधारण | २६.० | ३४.७ | ३९.० | ५२.० |
| | कमी | ९.० | १२.० | ८.० | १०.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५ण०** | **१००.०** |
| बास्केटबॉल | अत्याधिक | १८ | २४.० | १६.० | २१.३ |
| | साधारण | २२.० | २९.३ | २०.० | २६.७ |
| | कमी | ३५.० | ४६.७ | ३९.० | ५२.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. १ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या कौटूंबिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५६.० टक्के व अमरावती जिल्ह्यातील ४५.३ टक्के खेळाडूंचे कौटूबिंक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असल्याचे आढळले.
- **हँडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हँडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५३.३ खेळाडूंचे कौटूंबिक समायोजनाचे स्तर अत्याधिक असून अमरावती जिल्ह्यातील ५२.० टक्के खेळाडूंचे कौटूबिंक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४६.७ व अमरावती जिल्ह्यातील ५२.० टक्के खेळाडूंचे कौटूबिंक समायोजनाचे स्तर निम्न स्वरूपाचे असल्याचे आढळले.

**स्वास्थ्य समायोजन स्तर**

**सारणी क्र.२: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | | नागपूर जिल्हा | | अमरावती जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | प्रतिशत | वारंवारीता | प्रतिशत |
| व्हॉलीबॉल | अत्याधिक | ३३ | ४४.० | ३८.० | ५०.७ |
| | साधारण | २८.० | ३७.३ | २९.० | ३८.७ |
| | कमी | १४.० | १८.७ | ८.० | १०.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| हॅन्डबॉल | अत्याधिक | ४२ | ५६.० | ३६.० | ४८.० |
| | साधारण | २०.० | २६.७ | ३०.० | ४०.० |
| | कमी | १३.० | १७.३ | ९.० | १२.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| बास्केटबॉल | अत्याधिक | २२ | २९.३ | ३१.० | ४१.३ |
| | साधारण | ४६.० | ६१.३ | २६.० | ३४.७ |
| | कमी | ७.० | ९.३ | १८.० | २४.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००ण०** | **७५ण०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या स्वास्थ्य समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४४.० टक्के व अमरावती जिल्ह्यातील ५०.७ टक्के खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असल्याचे आढळले.
- **हँडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हँडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५६.० खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर अत्याधिक असून अमरावती जिल्ह्यातील ४८.० टक्के हँडबॉल खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ६१.३ टक्के खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे व अमरावती जिल्ह्यातील ४१.३ टक्के खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले स्वरूपाचे असल्याचे आढळले.

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

**सामाजिक समायोजन स्तर**

**सारणी क्र.३: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | | नागपूर जिल्हा | | अमरावती जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | प्रतिशत | वारंवारीता | प्रतिशत |
| **व्हॉलीबॉल** | अत्याधिक | ४३ | ५७.३ | २७.० | ३६.० |
| | साधारण | २७.० | ३६.० | ३९.० | ५२.० |
| | कमी | ५.० | ६.७ | ९.० | १२.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| **हॅन्डबॉल** | अत्याधिक | ३३ | ४४.० | ८.० | १०.७ |
| | साधारण | २९.० | ३८.७ | ३८.० | ५०.७ |
| | कमी | १३.० | १७.३ | २९.० | ३८.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| **बास्केटबॉल** | अत्याधिक | २३ | ३०.७ | २९.० | ३८.७ |
| | साधारण | ३४.० | ४५.३ | ३६.० | ४८.० |
| | कमी | १८.० | २४.० | १०.० | १३.३ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या सामाजिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५७.३ टक्के व्हॉलीबॉल खेळणारे खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असून अमरावती जिल्ह्यातील ५२.० टक्के खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **हॅंडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हॅंडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४४.० खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असून अमरावती जिल्ह्यातील ५०.७ टक्के हॅडबॉल खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४५.३ टक्के व अमरावती जिल्ह्यातील ४८.० टक्के खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.

**भावनिक समायोजन स्तर**

**सारणी क्र.४: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | | नागपूर जिल्हा | | अमरावती जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | प्रतिशत | वारंवारीता | प्रतिशत |
| **व्हॉलीबॉल** | अत्याधिक | ३७ | ४९.३ | २०.० | २६.७ |
| | साधारण | २५.० | ३३.३ | २९.० | ३८.७ |
| | कमी | १३.० | १७.३ | २६.० | ३४.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |

Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **हॅन्डबॉल** | अत्याधिक | २६ | ३४.७ | ३४.० | ४५.३ |
| | साधारण | ४१.० | ५४.७ | २८.० | ३७.३ |
| | कमी | ८.० | १०.७ | १३.० | १७.३ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| **बास्केटबॉल** | अत्याधिक | १३ | १७.३ | ९.० | १२.० |
| | साधारण | २७.० | ३६.० | २७.० | ३६.० |
| | कमी | ३५.० | ४६.७ | ३९.० | ५२.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या भावनिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४९.३ टक्के व्हॉलीबॉल खेळणारे खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असून अमरावती जिल्ह्यातील ३८.७ टक्के खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **हँडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हँडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५४.७ टक्के खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर साधारण असून अमरावती जिल्ह्यातील ४५.३ टक्के हँडबॉल खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४६.७ टक्के व अमरावती जिल्ह्यातील ५२.० टक्के खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर निम्न स्वरूपाचे असल्याचे आढळले.

**शैक्षणिक समायोजन स्तर**

**सारणी क्र.५: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| **समायोजन स्तर** | | **नागपूर जिल्हा** | | **अमरावती जिल्हा** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **वारंवारीता** | **प्रतिशत** | **वारंवारीता** | **प्रतिशत** |
| **व्हॉलीबॉल** | अत्याधिक | १८ | २४.० | १२.० | १६.० |
| | साधारण | ५०.० | ६६.७ | ३३.० | ४४.० |
| | कमी | ७.० | ९.३ | ३०.० | ४०.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| **हॅन्डबॉल** | अत्याधिक | २६ | ३४.७ | १४.० | १८.७ |
| | साधारण | ४१.० | ५४.७ | २९.० | ३८.७ |
| | कमी | ८.० | १०.७ | ३२.० | ४२.७ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| **बास्केटबॉल** | अत्याधिक | ३८ | ५०.७ | १८.० | २४.० |
| | साधारण | २२.० | २९.३ | २६.० | ३४.७ |
| | कमी | १५.० | २०.० | ३१.० | ४१.३ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००ण०** | **७५.०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या शैक्षणिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ६६.७ टक्के व अमरावती जिल्ह्यातील ४४.० टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचे शैक्षणि समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **हँडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हँडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५४.७ टक्के खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर साधारण असून अमरावती जिल्ह्यातील ४२.७ टक्के हँडबॉल खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर निमन स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५०.७ टक्के खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले व अमरावती जिल्ह्यातील ४१.३ टक्के खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर निम्न स्वरूपाचे असल्याचे आढळले.

**एकूण समायोजन स्तर**

**सारणी क्र.६: आंतरमहाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती**

| समायोजन स्तर | | नागपूर जिल्हा | | अमरावती जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|
| | | वारंवारीता | प्रतिशत | वारंवारीता | प्रतिशत |
| व्हॉलीबॉल | अत्याधिक | ३७ | ४९.३ | २३.० | ३०.७ |
| | साधारण | २४.० | ३२.० | ४६.० | ६१.३ |
| | कमी | १४.० | १८.७ | ६.० | ८.० |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| हॅन्डबॉल | अत्याधिक | ३० | ४०.० | २५.० | ३३.३ |
| | साधारण | २६.० | ३४.७ | ३४.० | ४५.३ |
| | कमी | १९.० | २५.३ | १६.० | २१.३ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |
| बास्केटबॉल | अत्याधिक | २१ | २८.० | १६.० | २१.३ |
| | साधारण | ३८.० | ५०.७ | ४०.० | ५३.३ |
| | कमी | १६.० | २१.३ | १९.० | २५.३ |
| | **एकुण** | **७५.०** | **१००.०** | **७५.०** | **१००.०** |

वरील सारणी क्रमांक ६ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्तरावर विविध खेळ (व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल) खेळणारे खेळाडूंच्या शैक्षणिक समायोजनाचे स्तरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **व्हॉलीबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४९.३ टक्के खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले व अमरावती जिल्ह्यातील ६१.३ टक्के व्हॉलीबॉल खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.
- **हँडबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार हँडबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ४०.० टक्के खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले असून अमरावती जिल्ह्यातील ४५.३ टक्के हँडबॉल खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.

- **बास्केटबॉल खेळाडू**: सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार बास्केटबॉल खेळणारे नागपूर जिल्हातील ५०.७ टक्के व अमरावती जिल्ह्यातील ५३.३ टक्के खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळले.

## निष्कर्ष

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचे कौटूंबिक समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळाडूंचे कौटूंबिक समायोजन साधारण स्तराचे, हँडबॉल खेळाडूंचे समायोजन अत्याधिक चांगले व बास्केबॉल खेळाडूंचे कौटुंबिक समायोजनाचे स्तर निम्न स्वरूपाचे आहेत.

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचा स्वास्थ्य समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल व हँडबॉल खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजन अत्याधिक चांगले स्तराचे व बास्केबॉल खेळाडूंचे स्वास्थ्य समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे आहेत.

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळाडूंचे सामाजिक समायोजन अत्याधिक चांगले स्तराचे तर हँडबॉल व बास्केबॉल खेळाडूंचे सामाजिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे आहेत.

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल खेळाडूंचे भावनिक समायोजन अत्याधिक चांगले स्तराचे, हँडबॉल खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे व बास्केटबॉल खेळाडूंचे भावनिक समायोजनाचे स्तर निम्न स्वरूपाचे आहेत.

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल व हॅन्डबॉल खेळाडूंचे शैक्षणिक समायोजन साधारण स्तराचे व बास्केटबॉल खेळाडूंचे शैक्षणिक समायोजनाचे स्तर अत्याधिक चांगले स्वरूपाचे आहेत.

### व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचा एकूण समायोजनाचे स्तर

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळाडूंचे एकूण समायोजनाचे स्तर साधारण स्वरूपाचे आहेत.

### संशोधनाचे गृहितकृत्य परीक्षण:

- नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन स्तरां दरम्यान सार्थक अंतर आहे.

प्राप्त परिणामांवरुन असे निदर्शनास येते की, नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन स्तरांत सार्थक अंतर आहे. यावरुन “नागपूर व अमरावती जिल्ह्यातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर व्हॉलीबॉल, हॅन्डबॉल व बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंच्या समायोजन स्तरां दरम्यान सार्थक अंतर आहे.” या गृहितकृत्याचा **स्वीकार** करण्यात येतो.

## संदर्भ ग्रथसूची

1. आलेगांवकर प.म., ‘मानसशास्त्र शिक्षण, शारीरिक शिक्षण, खेळ अर्थात क्रीडा मानसशास्त्र’, रघुवंशी प्रकाशन, २४३(ब), शुक्रवार पेठ, पुणे २, १९८९, पृ.क्र. १.
2. आलेगांवकर प.म., ‘प्रगत क्रीडामानसशास्त्र’ प्रकाशक अनिरुद्ध अनंत कुळकर्णी, कॉन्टिनेन्टल, विजयनगर, पुणे ३०, प्रथम आवृत्ती १९९४, पृ.क्र. २१
3. आलेगांवकर, प.ल. मानसशास्त्र शिक्षण, शारीरिक शिक्षण, खेळ, अर्थात क्रिडा मानसशास्त्र – कॅन्टीनेंटल प्रकाशन पुणे–३०

4. पाठक पी.डी., शिक्षा मनोविज्ञान, विनोद पुस्तक मंदीर, रांगेय राघव मार्ग, आग्रा,
5. दांडेकर, वा.ना. शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन.
6. मंगल, एस.के., भाटिया, एम.एम., खेल मनोविज्ञान प्रकाश ब्रदर्स एज्युकेशनल पब्लिशर ५४६, पुस्तक बाजार लुधियाना
7. सामान्य मानसशास्त्र – पंडीत व प्रा. कुळकर्णी व प्रा. गोरे, प्रकाशन – पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर.
8. सिंह, अ., बैस, ज., गिल, ज., बराड, र., राठी, नि., ''शारीरिक शिक्षा तथा ऑलम्पिक अभियान'', कल्याणी पब्लिर्श लुधियाना, नई दिल्ली, पृ. क्र. ३, (२००४)
9. घाटोळे रा. ना. समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर १० चतुर्थ आवृत्ती १९९०.
10. बोधनकर सु. अलोनी वि., 'सामाजिक संशोधनपद्धती' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर १९९३
11. बोधनकर सु., अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.
12. बोधनकर सु., सामाजिक संशोधन पध्दती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर १०, दुसरी आवृत्ती १९९९.
13. बोरूडे, रा. र., संशोधन पध्दतीशास्त्र, प्रकाशक–महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, तिसरी आवृत्ती १९८७.
14. कायंदे पाटील डॉ. गंगाधर वि. – संशोधन पद्धती चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक–१३, जून, २००६